३०
वनराई मासिक
१९९०-२०२०
हरितप्रबोधनाची त्रिदशकीय वाटचाल

ISSN 2250-1215

# वनराई

www.vanarai.org

## विशेषांक



# वनौषधी

## शाश्वत भविष्यासाठी...

# औषधी वनस्पती व रसशास्त्र

## परस्परसंबंध आणि महत्त्व

**आज सगळीकडे आयुर्वेदाचं बाजारीकरण झालं आहे. अशावेळी व्यापारी कंपन्यांनी तयार केलेल्या औषधांचा काही प्रमाणात रुग्णांना उपयोग नक्की होत असेल; परंतु रुग्णाचा जीव धोक्यात येतो किंवा तो गंभीर आजाराने पीडित असतो, त्या वेळी रुग्णनिहाय, व्यक्तिसापेक्ष चिकित्सा करणं अनिवार्य असतं. त्या वेळी बाजारू कल्पांचा उपयोग होत नाही आणि तिथंच रसशास्त्राचं, उत्तम गुणकारी वनस्पतींचं महत्त्व अधोरेखित होतं.**



**वैद्य योगेश बेंडाळे** हे ‘रसायु आयुर्वेद क्लिनिक्स’चे संचालक आहेत.



विद्यार्थिदशेत असताना औषधी करण्याची गोडी लागली. पुढं त्याचा नाद किंवा व्यसनंच लागलं असं म्हणायला हरकत नाही. त्याचं कारणही तसंच आहे. वैद्य कोल्हटकर सर, वैद्य बागेवाडीकर सर आणि इतर अनेक वैद्यांच्या मार्गदर्शनाखाली आमची आयुर्वेदाची भक्कम पायाभरणी झाली. त्या वेळेला जंगलात हिंडायचं, स्वतः वनस्पती तोडून आणायच्या, स्वतः मुळापासून औषधं तयार करायची, ती विविध वैद्यांना पुरवायची असा प्रवास सुरू असतानाच ‘आयुर्वेद रसायनी’ या औषधी करणाऱ्या कंपनीची निर्मिती झाली. ही कंपनी आता सुमारे दोनशेहून अधिक औषधं बनवते. या औषधांची जगातल्या अनेक ठिकाणी निर्यात होते.

वैद्यकीय व्यवसाय करण्याची वेळ आली तेव्हा कशा पद्धतीनं आपण काम करायचं, हे निश्चित केलं. सध्या सर्वांत लोकप्रिय असणारं ॲलोपॅथी हे शास्त्र आणि त्यात प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टर्सना येणाऱ्या मर्यादा आयुर्वेदाच्या माध्यमातून सोडविण्यासाठी, त्यात येणारी आरोग्यविषयक आव्हानं आयुर्वेदाच्या माध्यमातून स्वीकारण्यासाठी आणि रुग्णांना-समाजाला केंद्रस्थानी ठेवून अधिकाधिक चांगली चिकित्सा देण्यासाठी काम करायचं, हे निश्चित करूनच मी चिकित्सेला सुरुवात केली. या गोष्टीला आता पंचवीसहून अधिक वर्षं झालीत.

आज असे हजारो रुग्ण आहेत की

## औषधी निर्मितीकरिता लागणाऱ्या नित्य वापराच्या लागवडीचा विचार व्हावा, अशा वनस्पतींची यादी

| अ.क्र. | औषधी वनस्पतीचे नाव | अ. क्र. | औषधी वनस्पतीचे नाव | अ. क्र. | औषधी वनस्पतीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | अशोक साल | २६ | रिंगणी पंचांग | ५१ | मुरूड शेंग |
| २ | अर्जुन साल उपळसरी मूळ | २७ | घायटीफूल | ५२ | वरधारा |
| ३ | आस्कंद (ढोरगुंज नव्हे) | २८ | धमासा | ५३ | वावडिंग काळा |
| ४ | कुटकी | २९ | नागरमोथा | ५४ | वावडिंग लाल |
| ५ | कुचला | ३० | नागकेशर अस्सल | ५५ | विदारी कंद |
| ६ | कुडा साल | ३१ | नागकेशर सुरंगी कळ्या (लाल) | ५६ | शंखपुष्पी |
| ७ | कोकम तेल | ३२ | नागकेशर उंडीचे कळे काळे | ५७ | सोनामुखी पाने सोनामुखी शेंगा |
| ८ | कडू जिरे | ३३ | निशोत्तर सफेद | ५८ | शतावरी मुळ्या |
| ९ | तुळस बी | ३४ | निशोत्तर काळे (तेड) | ५९ | सालवण |
| १० | करंज साल | ३५ | कडुनिंब साल | ६० | पिठवण |
| ११ | कोरफड गर | ३६ | निंबपत्र | ६१ | पाडळ मूळ |
| १२ | वाळा | ३७ | कडू पडवळ | ६२ | हिरडा फोडलेला |
| १३ | गुलाबकळी | ३८ | पाषाण भेद | ६३ | बाळहिरडा |
| १४ | गुग्गुळ | ३९ | पुनर्नवा | ६४ | सुरवारी हिरडा |
| १५ | बेडकी पाला (गुडमार) | ४० | पहाडमूळ | ६५ | अष्टवर्ग |
| १६ | गोखरू | ४१ | पित्तपापडा घास | ६६ | अतिविष |
| १७ | चवक | ४२ | पित्तपापडा चाकी | ६७ | अगरू |
| १८ | चंदन छिलका | ४३ | वेखंड | ६८ | धोत्रा बी कृष्ण |
| १९ | चिराईत | ४४ | बेहेडादळ बीशिवाय | ६९ | गव्हला |
| २० | चित्रकमूळ | ४५ | ब्राह्मी | ७० | पिंपळी (लेंडी नवसारी) |
| २१ | जटामांसी | ४६ | बेलमूळ | ७१ | पिंपळ मूळ |
| २२ | ज्येष्ठमध | ४७ | बला पंचांग | ७२ | जेपाळ वी |
| २३ | जितसाया | ४८ | बलामूळ | ७३ | मायफळ |
| २४ | जांभूळ बी | ४९ | चिकणामूळ | ७४ | कडशिंगी गोल |
| २५ | डिकेमाली | ५० | बेलकाचरी | ७५ | बचनाग श्वेत |

| अ. क्र. | औषधी वनस्पतीचे नाव | अ. क्र. | औषधी वनस्पतीचे नाव | अ. क्र. | औषधी वनस्पतीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| ७६ | तालीसपत्र | ९६ | बावची बी | ११६ | बचनाग कृष्ण |
| ७७ | टेंटू मूळ/साल | ९७ | बिब्बे | ११७ | वेलची लहान |
| ७८ | दंतीमूळ | ९८ | माका | ११८ | दालचिनी |
| ७९ | दशमूळे | ९९ | भारंगमूळ | ११९ | लवंग |
| ८० | दारूहळद | १०० | मंजिष्ठ देशी | १२० | मिरी |
| ८१ | गुळवेल | १०१ | मोरवेल | १२१ | सुंठ |
| ८२ | ओवा | १०२ | रक्तरोडा साल | १२२ | पळसफूल |
| ८३ | आवळकाठी | १०३ | रक्तचंदन | १२३ | पळस बी (पापडी) |
| ८४ | रिठा | १०४ | पतंग | १२४ | रिंगणी बोंडे |
| ८५ | अडुळसा (वाळलेली पाने) | १०५ | असाणा साल | १२५ | रिंगणी मूळ |
| ८६ | इंद्रजव | १०६ | बिबळा साल | १२६ | कंकोळ |
| ८७ | इसबगोल बुशी | १०७ | रास्ना खडकी | १२७ | कालमेघ (वसईकडील काडेचिराईत) |
| ८८ | खैरसाल काळा बोळ | १०८ | पिंपळलाख कच्ची | १२८ | कांचनसाल |
| ८९ | कपिला | १०९ | लोध्र | १२९ | रानमूग |
| ९० | आंबेहळद | ११० | धूप | १३० | रानउडीद |
| ९१ | कचोरा | १११ | ऊद | १३१ | शरपुंखा |
| ९२ | कापूर काचरी | ११२ | लिंबोण्या | १३२ | सोमलता |
| ९३ | कमळफूल | ११३ | वरुण साल | १३३ | शिवण साल |
| ९४ | कवच बीज | ११४ | डुक्कर कंद | १३४ | ऐरण साल |
| ९५ | सागरगोटा | ११५ | भुईकोहळा | १३५ | एरंड मूळ |

ज्यांना अतिशय मर्यादित आयुष्य सांगितलं गेलं होतं; पण आयुर्वेदीय चिकित्सेनं ही मंडळी केवळ जगलीच नाही, तर अत्यंत उत्तम आयुष्यही ते व्यतीत करत आहेत. या सगळ्याचं श्रेय उत्तम दर्जाच्या वनस्पती औषधांना आणि त्याला जोड दिलेल्या रसशास्त्र औषधांना द्यावं लागेल. आयुर्वेदात सांगितलेल्या वनस्पती सर्व ठिकाणी मिळतातच असं नाही; परंतु एखाद्या रुग्णाचा जीव धोक्यात असताना, त्या वेळेला नेमकी तीच वनस्पती किंवा त्याच स्वरूपाचा कल्प लागतो. त्यामुळंच या वनस्पतींची विशेषतः दुर्मीळ वनस्पतींची लागवड करणं किंवा त्यापासून उत्तमोत्तम, सक्षम, अत्यंत वीर्यवान असं कल्प बनवण्याचं काम आजही सुरू आहे.

अलीकडेच एका लहान बाळाला पंधरा दिवसांचं आयुष्य सांगितलं होतं. ते 'आयसो व्हॅलेरिक असेडेमिया' नावाच्या आजारानं पीडित होतं. आधुनिक शास्त्राकडे त्या बाळाकरता देण्याकरिता काहीही नव्हतं. प्रामाणिकपणे सांगायचं तर मला अशा स्वरूपाची चिकित्सा देण्याचा कोणताही अनुभव नव्हता. हे मी त्या पालकांना स्पष्टपणे सांगितलं होतं; पण तरीही प्रयत्न केले. त्या बाळाचं नशीब बलवत्तर होतं. ते बाळ आज सहा वर्षांचं असून ते शंभर टक्के

निरोगी आयुष्य जगते आहे. हे आयुर्वेदिक चिकित्सेचंच यश आहे. वनस्पती औषध आणि त्याला रसशास्त्राची जोड यामुळंच हे शक्य झालं. मूत्रपिंड निकामी झालेले, यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया सांगितलेले, कर्करोगाचे उपचार सुरू असलेले, गर्भधारणा होत नसलेले, पॉलिसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम असलेले रुग्ण आज यशस्वीपणे आयुर्वेदिक उपचार घेत आहेत. या अशा काही आजारांत आधुनिक शास्त्राकडेही अधिक परिणामकारक चिकित्सा उपलब्ध नाही. अशा दुर्धर रोगांवर आज रसशास्त्राच्या माध्यमातून चिकित्सा केली जाते. खरं तर प्रत्येक रुग्ण हे एक आव्हानच असते. प्रत्येक रुग्णाला दिलेलं औषध हे विशिष्टच असतं. अशा वेळेला त्या रुग्णाला आपल्याला जे औषध देणं क्रमप्राप्त आहे, ती औषध मिळवणं किंवा ती औषधं स्वतःच्या देखरेखीखाली निर्माण करणं हेही मोठं आव्हान असतं. अशी विशिष्ट औषधं रुग्णांसाठी वापरली तरच अशा दुर्धर आजारांचं निराकरण आपण करू शकतो. आज सगळीकडे आयुर्वेदाचं बाजारीकरण झालं आहे. अशा वेळी व्यापारी कंपन्यांनी तयार केलेल्या औषधांचा काही प्रमाणात रुग्णांना उपयोग नक्की होत असेल; परंतु रुग्णाचा जीव धोक्यात येतो किंवा तो गंभीर आजाराने पीडित असतो, त्या वेळी रुग्णनिहाय, व्यक्तिसापेक्ष चिकित्सा करणं अनिवार्य असतं. त्या वेळी बाजारू कल्पांचा उपयोग होत नाही आणि तिथंच रसशास्त्राचं, उत्तम गुणकारी वनस्पतींचं महत्त्व अधोरेखित होतं.

रसशास्त्राचं महत्त्व सांगताना ग्रंथकारानं असं सांगितलं आहे की,
"अल्पमात्रोपयोगित्वादरुचेऽप्रसंगत:।
क्षिप्रमारोग्यदायित्वादौषधेभ्योऽधिको रस : ।।"
(रस रत्न समुच्चय)

आर्ष ग्रंथकारांनी वनस्पतींवर भर दिला. साध्या चूर्ण कल्पनेचा विचार देण्यास त्याची मात्रा ही सुमारे एक तोळा ते चार तोळ्याच्या आसपास आपल्याला मिळते. म्हणजे एक साधारण ४०-४५ ग्रॅम इतकं चूर्ण आपण सध्याच्या काळात एकावेळी वापरू शकत नाही किंवा स्वरससाची मात्रा, काढ्याची मात्रा या आधुनिक काळात अशा स्वरूपात वापरणं, तयार करणं किंवा त्या टिकवणं याही गोष्टी प्रत्यक्षात अत्यंत अवघड होऊन बसल्या आहेत. अर्थात ही कल्पना ग्रंथकारांना होती. म्हणून भविष्यात येणाऱ्या आव्हानांचा वेध घेऊन आचार्यांनी रसशास्त्राची निर्मिती केली. त्यायोगे कमीत कमी मात्रेत औषधं, चवहीन औषधं, घेण्याला सुटसुटीत, सोपी, साधी अशा स्वरूपाची औषधं, दिसायला चांगल्या वर्णाची/रंगाची औषधं निर्माण केली गेली. हे करत असताना त्यांनी उपलब्ध असणारी सर्व खनिजे, प्राणिज, विषारी वनस्पती अशा सर्वांचा पुरेपूर आणि व्यापक पद्धतीनं उपयोग केला. अनेक धातूंचा वापर केला. रसशास्त्रानं या धातूंचा वापर करून त्यातून तयार केलेले कल्प हेसुद्धा आज आधुनिक शास्त्राच्या दृष्टीनं सगळ्यात मोठं आव्हान बनलं आहे.

आज आधुनिक उपकरणांच्या सहाय्यानं औषधांचं पृथक्करण करण्याची सोय उपलब्ध आहे. आयुर्वेदातही पृथक्करण करण्याच्या, तपासणीच्या, सिद्धी, लक्षणांच्या कसोट्या दिलेल्या आहेत. अद्ययावत आधुनिक तंत्रज्ञान येऊनही आयुर्वेदानं सांगितलेल्या या कसोट्या आजही सर्वश्रेष्ठ समजल्या जातात, हे इथं अभिमानानं नमूद करावंसं वाटतं.

अत्यंत स्वस्तात, सहज तपासता येण्याजोगी तत्त्व, कोट्यवधी रुपयांची कोणत्याही स्वरूपाची तपासण्याची यंत्रणा लागण्याची गरज नसणाऱ्या या पद्धतींचा अवलंब करून रसशास्त्रीय औषधांची निर्मिती करता येते. साधे भस्म ही कल्पना घेतल्यास त्यासाठी वेगवेगळ्या वनस्पतींचा वापर अनिवार्य असतो. रसशास्त्रामध्ये भस्म कल्पना किंवा वटी कल्पना किंवा रसायन कल्पना, पर्पटी कल्पना, सिंदूर कल्पना, पोट्टली कल्पना किंवा अगदी सर्वोच्च समजली जाणारी द्रुती कल्पना या स्वरूपाच्या सर्व कल्पनांमध्ये विविध पद्धतीची खनिज, धातू, रत्न, उपरत्न, विष, उपविष यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या सर्व खनिजांचा किंवा धातूंचा शरीराला उपयुक्त तेवढाच परिणाम मिळण्याकरता त्यांच्यावर विविध वनस्पतींचे संस्कार होतात. या वनस्पतींच्या संस्काराचा धातूंवर किंवा खनिजांवर उपयोग करून त्यांची गुणवृद्धी करतात. त्यांच्यातील नको असणारे गुण काढून टाकून त्यांचे वीर्य वाढवलं जातं. अति वीर्यवान असतील तर ते कमी केलं जातं, योग्य ठिकाणी योग्य मात्रेमध्ये योग्य वेळेला ते द्रव्य पोहोचवून शरीरात योग्य पद्धतीचं कार्य साधलं जातं. हे सर्व घडतं ते वनस्पतींच्या माध्यमातून धातू किंवा खनिजांवर केल्या जाणाऱ्या संस्कारातून. इतका वनस्पती आणि रसशास्त्राचा जवळचा संबंध आहे. अग्नीच्या सहाय्याने रसशास्त्रानं अत्यंत मौल्यवान आणि वीर्यवान कल्प/औषधं अत्याधुनिक जगाला दिली आहेत, ते केवळ वनस्पतींच्या माध्यमातून.

गेल्या पंचवीस वर्षांपासून आम्ही भारतासह, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, इटली, स्पेन, अमेरिका, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया अशा विविध देशांमध्ये काम करतो आहोत. तिथल्या दुर्धर आजारांनी पीडित रुग्णांवर यशस्वी चिकित्सा करतो आहोत. त्याचं श्रेय केवळ रसशास्त्रीय औषधांना, त्यांच्यावर केलेल्या वनस्पतीज द्रव्यांच्या संस्कारांनाच द्यावं लागेल. हे करत असताना कोणत्याही तऱ्हेचे शॉर्टकट उपयोगी पडत नाहीत. ग्रंथांनी दिलेल्या तत्त्वांना अनुसरल्यानंच आज हजारो रुग्णांना जीवनदान आणि उत्तम आयुष्य देण्याचं भाग्य आम्हाला लाभलं आहे.

***इ-मेल : cmd@rasayu.com***